## प्रेस नोट दिनांक २०/०६/२०१९

## भरदिवसा रहदारीच्या ठिकाणी जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना युनिट १, गुन्हे शाखेच्या टिमने २४ तासाच्या आत केले जेरबंद

खडक पो.स्टे. येथे गुरनं २६१/१९ भादविक ३९२,३४१,३४ प्रमाणे दि. १८/६/२०१९ रोजी २३:४३ वा. दाखल आहे. यातील फिर्यादी परेशकुमार कडीया हे श्री पटेल यांचे कुरीअर व्यवसायात नोकरी करतात. ते दि. १८/६/२०१९ रोजी त्यांचेकडील ॲक्टिव्हा गाडीवरून ७ लव्हज चौकातून जात असतांना त्यांना यातील आरोपी म।ािर यांनी कारमधून येवून, कार अडवी लावून फिर्यादीस ढकलून देवून, धमकावून जबरदस्तीने त्यांचे कारमध्ये बसवून, फिर्यादीचे ॲक्टिव्हाचे डिकीतील रोख रक्कम रु. ५,००,०००/- (पाच लाख रुपये ) जबरदस्तीने काढून घेवून त्यांना सुमारे ५ कि.मी. पुढे गाडीत नेऊन, नंतर सोडून देवून पळून गेलेबाबत गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्हयाचे घटनास्थळी आम्ही स्वतः, सहा.पो.आयुक्त,गुन्हे-१ श्री समिर शेख सो, तसेच युनिट-१ कडील अधिकारी व कर्मचारी असे लागलीच घटनास्थळी भेट दिली. घटनास्थळावरून दाखल गुन्हयाचे अनुषंगाने स्थानिक चौकशी करून माहिती घेतली. अधिकारी व कर्मचारी यांची तपास पथके तयार करून यातील फिर्यादी यांनी फिर्यादीमध्ये नमुद केलेल्या चारचाकी वाहनाचा नंबर घेवून तात्काळ सदर वाहनाच्या मालकाबाबत माहिती घेतली. त्याचेकडे विचारपुस केली असता, त्याने सदरची गाडी श्याम शिंदे रा. पर्वती, पुणे याचेकडे गहाण ठेवली असल्याची माहिती मिळाली. यातील फिर्यादी यांचेकडुन आरोपीचे वर्णन घेवून मिळालेल्या माहितीसह यातील आरोपींची बातमीदारांमार्फत माहिती काढून शोध घेत असताना, पो.ना.२२९७ जाधव यांना बातमी मिळाली की, दाखल गुन्हयात इसम नामे १) दिपक राजाराम गायकवाड वय ३५ वर्ष रा नटराज हौसिंग सोसायटी,नेहरुनगर पिंपरी पुणे २) बालाजी लक्ष्मण मसुरे, वय ३३ वर्ष रा. सदगुरु कॉलनी,थेरगाव पुणे यांचा सहभाग आहे. तेव्हा त्यांची माहिती काढुन शोध घेत असताना ते मिळून आले. त्यांनी त्यांचा मित्र श्याम शिंदे व आकाश जाधव, निकुंज पटेल, मेहमुद सैय्यद यांचे बरोबर सदरचा गुन्हा केला असल्याचे सांगितले आहे. त्यांना ताब्यात घेवून दाखल गुन्हयाचे पुढील अधिक तपास व कारवाईकामी खडक पोलीस स्टेशन येथे हजर केले आहे.

सदरची कारवाई ही श्री.अशोक मोराळे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.शिरीष सरदेशपांडे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्री.समिर शेख, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अरुण वायकर, पो.उप.निरी. दिनेश पाटील, हनुमंत शिंदे, पोलीस कर्मचारी सचिन जाधव,अजय थोरात,अनिल घाडगे, रिजवान जिनेडी, तुषार खडके, वैभव स्वामी, श्रीकांत वाघवले, सुधाकर माने, बाबा चव्हाण, सुभाष पिंगळे, योगेश जगताप, अमोल पवार, उमेश काटे, वसावे, प्रकाश लोखंडे, गजानन सोनुने, तुषार माळवदकर, बशीर सय्यद यांनी केली आहे.